MHOS130002032010

नि.दि.दा.क्र.४९/२०१०
कृष्णा बोराडे व इतर विरुध्द
अंकुश पाटील व इतर

## निशाणी क्र.८४ च्या अर्जावरील आदेश

सदरचा अर्ज वादी यांच्या विरुध्द 'पुरावा बंद' चा आदेश रद्द करुन वादींना पुरावा देण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे कथनानुसार, प्रस्तुत प्रकरणात दावा मिळकती संदर्भातील मे.परंडा न्यायालयातील दावा नंबर १०२/१९५१ चा निकाल ऊर्दु भाषेत असल्याने सदर निकालाच्या नकला मुदतीत मिळाल्या नसल्याने वादी मुदतीत पुरावा देऊ शकले नाहीत. परिणामी 'वादींचा पुरावा बंद' चा आदेश निशानी क्र.५५ अन्वये दिनांक १०.१२.२०१९ रोजी पारीत करण्यांत आलेला आहे. वादींनी सदर निकाल्याच्या सहीशिक्याच्या प्रती तसेच त्यासोबत ऊर्दु निकालाचे मराठीत भाषांतराच्या प्रतिही मे.न्यायालयात दाखल केल्या आहेत. वादी हे प्रकरणात हजर राहून पुरावा देण्यांस तयार आहेत. सदर निकालाचे मराठीत भाषांतर करणारे अन्सारी अब्दुल रशिद पि. महमंद इब्राहीम यांची साक्ष मे.न्यायालयात नोंदविणे, प्रकरणाची सत्यता मे.न्यायालयासमोर येणेकरीता वादीतर्फे नोंदविणे योग्य व न्याय्य आहे. सबब वादींनी त्यांच्या विरुध्दचा 'पुरावा बंद' चा आदेश रद्द होऊन पुरावा देण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

०३. प्रतिवादींनी वादींचे अर्जास जोरदार आक्षेप नोंदवला आहे. सदर अर्जातील नमुद कारण खोटे व चुकीचे असुन वादीने विनाकारण प्रकरण लांबविणेचे हेतुने मुद्दाम उशीर केलेला आहे. सबब वादीने प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. वैकल्पीकरित्या प्रतिवादींनी कथन केले आहे की, वादींचा अर्ज मंजुर करावयाचा असल्यास सदर वादींवर जास्तीत जास्त दंड बसवण्याची मागणी केली आहे.

**०४.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. निशानी ५५ कडे वादीने दिनांक १०.१२.२०१९ रोजी मुदतीसाठीचा अर्ज दिला होता. सदरचा अर्ज नामंजूर करुन वादीचा पुरावा बंद करण्यात आला होता. पुन्हा वादी यांनी निशानी ५७ कडे अर्ज देऊन दिनांक १०.१२.२०१९ रोजी झालेला 'पुरावा बंद' आदेश रद्द करुन मिळणेबाबत विनंती केली होती. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी निशानी ५७ कडे दिनांक ०१.०३.२०२१ रोजी वादीस रक्कम रुपये ३००/– इतक्या रकमेचा दंड बसवून अर्ज मंजुर केला होता. प्रतिवादी यांनी दंडाची रक्कम ३००/– यापूर्वीच स्वीकारली आहे. रोजनाम्याचे अवलोकन करता प्रकरण निशानी ५७ कडील आदेशाने वादीच्या पुराव्यास लागल्याचे दिसुन येते. तद्नंतर प्रतिवादी क्र.३ हे मयत झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याची प्रक्रिया वादीतर्फे राबविण्यात आली. परिणामतः प्रतिवादी क्र.३ चे वारस दाव्यात हजर झाले. प्रकरण पुन्हा वादीचे पुराव्याकरीता निश्चीत करणे आवश्यक असताना नजरचुकीने प्रकरण प्रतिवादी यांच्या पुराव्यास लागल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचे प्रकरण हे वादीच्या पुराव्यासाठीच नेमले असुन प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर केवळ दाखल करण्यात येत आहे. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

सदरचे प्रकरण हे १३ वर्षापेक्षा जुने असल्याने वादीने त्यांचा पुरावा लवकरात लवकर सादर करावा.

स्वाक्षरीत/–

दिनांक : २७.११.२०२३

( **श्रीमती एस.जे.पाटील** )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

**प्रमाणपत्र**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. न्यायनिर्णय /आदेश यामधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णय /आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव : एन. व्ही. कोळी, लघुलेखक ग्रेड–३.

न्यायालयाचे नाव : सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, भूम,
ता. भूम, जि.उस्मानाबाद.

आदेश दिनांक : २७.११.२०२३

आदेशावर स्वाक्षरी केलेचा दिनांक : २७.११.२०२३

आदेश अपलोड केलेचा दिनांक : २८.११.२०२३